# Vidyawarta

UGC Approved Journal list_ View Details_
https://goo.gl/FC52UM

**Impact factor**

Monthly published

Indexed (IIJIF)

**Open Access**

**Recommended**

**Peer-reviewed**

**Trademark**

**Refereed**

IMPACT 4.014 iijif FACTOR


*Edit By*

Dr. Gholap Bapu Ganpat

Parli Vaijnath, Dist.Beed 431 515

(Maharashtra, India)

Cell : +91 75 88 05 76 95


Indexed

Indexed


ISSN-2319 9318

*Publisher & Owner*

Archana Rajendra Ghodke

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra)

₹ ३००/-

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018

SPECIAL ISSUE - XXIX

# प्रसारमाध्यमांचा साहित्यावरील प्रभाव




अतिथी संपादक :

डॉ. डी. एन. कारे

प्राचार्य,

म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

खेडगांव, ता. दिंडोरी, जि. नाशिक (महाराष्ट्र)

मुख्य संपादक :

डॉ. धनराज धनगर

सहाय्यक प्राध्यापक,

महात्मा गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

प्रा. विठ्ठल जाधव व डॉ. गीतांजली चिने

म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, खेडगांव, ता. दिंडोरी, जि. नाशिक

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 29 : प्रसारमाध्यमांचा साहित्यावरील प्रभाव
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखक /लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १ | साहित्य, भाषा आणि प्रसारमाध्यमांचे नाते | प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे | ०५ |
| २ | मराठी साहित्याचा मराठी चित्रपटावरील प्रभाव | डॉ.राजेंद्र थोरात | १२ |
| ३ | मराठी साहित्यातील कादंबरी ते चित्रपट : माध्यमांतर | डॉ. मारुती घुगे | १६ |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स मिडियावरील साहित्याचा दर्जा | डॉ. संदीप सांगळे | १९ |
| ५ | साहित्यकृतीचे माध्यमांतर : प्रभाव संकल्पना | डॉ. प्रकाश शेवाळे | २२ |
| ६ | माध्यमांतर होऊ शकणाऱ्या कलाकृती | प्रा. भास्कर ढोके | २५ |
| ७ | प्रसारमाध्यमांमुळे साहित्याची बदललेली स्थिती–गती | डॉ. लता पवार | ३० |
| ८ | प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य : सहसंबंध | डॉ. दिलीप पवार | ३४ |
| ९ | प्रसारमाध्यमांमुळे साहित्याची बदललेली स्थिती–गती | डॉ. भूपेंद्रसिंग राजपूत | ३७ |
| १० | प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य : सहसंबंध | डॉ. सुरेश जाधव | ४० |
| ११ | दूरदर्शन आणि चित्रपटातील मराठी भाषेचे अवमूल्यन | प्रा. नारायण पाटील | ४२ |
| १२ | प्रसारमाध्यमे : एक दृष्टीक्षेप | प्रा. व्ही.एस. जाधव | ४५ |
| १३ | इलेक्ट्रॉनिक्स मिडियावरील मराठी साहित्याची स्थिती | डॉ. गीतांजली चिने | ४८ |
| १४ | माध्यमांतर प्रक्रिया : एक दृष्टीक्षेप | डॉ. छाया शिंदे | ५४ |
| १५ | प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य : सहसंबंध | श्रीमती एम.एच. गवळी | ५८ |
| १६ | प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य : सहसंबंध | प्रा. सुनीता उफाडे | ६१ |
| १७ | माध्यमांतर व मराठी कादंबरी | डॉ. शरद नागरे | ६३ |
| १८ | प्रसारमाध्यमांमुळे साहित्याची बदललेली स्थिती–गती | डॉ. स्नेहल दुडे | ६८ |
| १९ | आधुनिक प्रसारमाध्यमे आणि बदलता वाचनव्यवहार | प्रा. कैलास सलादे | ७० |
| २० | मराठी वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप | प्रा. विनोद केदारे | ७२ |
| २१ | प्रसारमाध्यमे व मराठी साहित्य : एक अनुबंध | श्रीमती सारिका गांगुर्डे | ७६ |
| २२ | प्रसारमाध्यमांची बदलत्या काळातील विधायकता | प्रा. देविदास शिंदे | ७८ |
| २३ | प्रसारमाध्यमे व साहित्याची भाषा | प्रा. महेश बनकर | ८१ |
| २४ | दूरदर्शन व प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव | प्रा. सोनाली रिपोटे | ८४ |
| २५ | प्रसारमाध्यमातील मराठी साहित्यदर्शन | प्रा. माधव खालकर | ८८ |
| २६ | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरुप व त्यांचा साहित्यावरील प्रभाव | प्रा. नंदू दाजीबा गवळी | ९० |
| २७ | प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य : सहसंबंध | प्रा. कविता जाधव | ९४ |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखाचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 29 : प्रसारमाध्यमांचा साहित्यावरील प्रभाव | January 2018
UGC Approved No. 40705 & 44117

# प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य : सहसंबंध

डॉ. दिलीप पी. पवार
संशोधन समन्वयक व विभागप्रमुख,
मराठी विभाग,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

अलिकडच्या काळातील संपूर्ण जगातील विविधांगी घटनांचे अवलोकन केल्यास एक बाब सहज ध्यानात येते, ती म्हणजे सद्यस्थितीला प्रसारमाध्यमे ही व्यक्ती, समाज, संस्था व राष्ट्राच्या भूमिकांवर प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष प्रभाव टाकताना दिसत आहेत. याला सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा (आंतरराष्ट्रीय संबंध). तसेच साहित्य हे क्षेत्र देखील अपवाद ठरत नाही. म्हणूनच आजच्या काळाची नेमकी ओळख प्रसारमाध्यमाशिवाय करून देणे हे चुकीचे आहे. दैनंदिन मानवी आयुष्य आणि प्रसारमाध्यमे यांचा अनेक बाबीमुळे जवळचा संबंध आला आहे. त्यामुळे समाजमन जडणघडणीत वा लोकभावनांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष वळण लावत आहे. आणि त्यामुळेच आज लोकविचार व कृती यात प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावताना आढळतात. यासाठीच लोकशाही राष्ट्रात प्रसारमाध्यमे अर्थात वृत्तपत्रसृष्टीला एक महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आढळून येते. यासाठी आजच्या काळात 'प्रसारमाध्यमांनी आपली विश्वसनीयता जपणे', जेवढे आवश्यक आहे तेवढेच प्रसारमाध्यमाचे स्वातंत्र्य जपणे आवश्यक आहे. सदर लेखात प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य यांच्या सहसंबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रसारमाध्यमे ही आधुनिक काळातील नवी ओळख असून साहित्य हा प्राचीन काळापासून चालत आलेला कलात्मक व्यवहार आहे. समाजातील चहू स्तरातील घडामोडींची इत्यंभूत माहिती ज्याद्वारे आपणापर्यंत पोहचते त्याला प्रसारमाध्यमे संबोधले जाते तर, 'साहित्य मानवी भावना, संवेदना व विचार यांचे भाषेच्या माध्यमातून व्यक्त झालेला एक कलात्मक प्रकार आहे.' साहित्य हे मानवी अभिव्यक्तीचा एक महत्त्वाचा भाग आहे, तर मानवी आचार, विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठीचा प्रसारमाध्यमे हे एक महत्त्वाचा स्तंभ आहे. या अर्थाने प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. एकूणच लोकमन जाणून व लोकमनाला निर्भय वाचा देणे, सत्य जाणणे हा पत्रकारितेचा हेतू असतो.

प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य यांचे कार्य आणि उद्दिष्टे या अंगाने विचार करीत असता प्रसारमाध्यमांच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, झोपलेल्यांना जागे करणे, जागे झालेल्यांना बसते करणे, बसलेल्यांना उभे करणे आणि अखेर क्रियावंत बनविणे म्हणजेच एखाद्याला किंवा अनेकांना मूळ प्रश्नांची जाणीव करून देणे, अन्यायाला वाचा फोडणे, ज्यांना आधार हवा आहे त्याला तो आधार देणे, समाज ही एक गाडग्या मडक्यांची उतरंड आहे. सर्वांत खालच्या गाडग्यावर वरच्या गाडग्या मडक्याचे दडपण असते. त्यांचे तोंड खुले करणे व सर्व गाडग्यांना समानतेवर आणणे व अन्याय संपविणे हे वृत्तपत्राचे कार्य असते. तर साहित्यात मानवी जीवनाच्या चित्रणासह 'सत्य, शिवम् सुंदरम' ही ठळक कार्ये प्रेरणा आढळून येतात. एकूणच प्रसारमाध्यमे आणि साहित्य कार्ये हे समाजाच्या प्रगतीसाठीच दिसून येतात.

मराठीमध्ये विशेषत: भारतात प्रसारमाध्यमांची परंपरा ही अलिकडच्या काळातील आहे. त्यामध्ये वृत्तपत्रसृष्टी, इलेक्ट्रॉनिक मिडीयासह नव काळातील सोशल मिडियाचा देखील समावेश होतो. त्या अर्थाने प्रसारमाध्यमांची परंपरा ही अलीकडची आहे. याउलट मराठी साहित्याची परंपरा तुलनेने दीर्घ स्वरूपाची आहे. शिवाय मौखिक–लिखित साहित्य परंपरेत काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यात स्थित्यंतरस्वरूप साहित्यात आशय, विषय व नवीन रूप–प्रकार घेऊन साहित्याची परंपरा आपणाला दिसून येते.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013) | January 2018
Special Issue 29 : प्रसारमाध्यमांचा साहित्यावरील प्रभाव
UGC Approved No. 40705 & 44117

प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर प्रभाव वा परिणाम

ब्रिटिश काळापासून प्रसारमाध्यमांचा (वृत्तपत्रसृष्टीच्या) उदयानंतर मराठी साहित्यसृष्टीवर विशेष परिणाम आल्याने दिसून येते. नियतकालिकांमधूनच तत्कालीन अनेक साहित्यकृती जन्माला आल्या, प्रसिद्धी पावल्या आणि आज देखील मराठीतील अनेक लेखक—लेखिका प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून मराठी साहित्य विश्व समृद्ध करताना दिसून येतात. ज्यामध्ये अनेक लेखकांनी आपली अभिव्यक्तीसाठी नव संवाद माध्यमांना हाताशी धरलेले दिसून येते. यामध्ये प्राधान्याने नाव येते ते कविता महाजन याशिवाय अनेक कवींचा देखील समावेश दिसून येतो.

कविता महाजन यांनी आपले बरेच साहित्य फेसबुक, ब्लॉग यावर लिहिल्याचे आढळून येते. याशिवाय फार मोठ्या प्रमाणात वाचक त्यांना ऑनलाईन फॉलोव, लाईक करतात. विशेष बाब म्हणजे मराठी साहित्यावर प्रसारमाध्यमाचा प्रभाव दाखवताना विशेषत्वाने सांगावेसे वाटते की, कविता महाजन यांनी मराठीमध्ये पहिली भारतीय मल्टिमीडिया कादंबरी लिहिली आहे. कविता महाजन यांनी 'कुहू' ही चित्रं, छायाचित्रे, व्हिडीओ, निमेशन, संगीत आणि अर्थातच शब्द यांनी बनलेली ही साहित्यकृती आहे. प्रसारमाध्यमांच्या काळात या कादंबरी लेखनातील ही प्रयोगशील निर्मिती म्हणजेच प्रसारमाध्यमाचा मराठी साहित्याच्या अंतःसंबंध स्पष्ट करणारे, प्रभाव सूचित करणारा असाच आहे. या व्यतिरिक्त त्यांनी लिहिलेली भिन्न ही मराठीत वृत्तात्मक स्वरूपाची कादंबरी आहे. ज्यातून मराठी कादंबरीत विश्वात वृत्तात्मक कादंबरी हा नवीन कादंबरी 'रूप' निर्माण केले.

याशिवाय मराठी अवघ्या सोळा वर्षाच्या मुलीने नव्याने पहिली—वहिली 'लॉग—आऊट' ही कादबरी लिहिली. सदर कादंबरीची लेखिका श्रुती आवटे हीने फेसबुकवर प्रारंभी अनुभव कथन करीत असताना त्यातून पुढे ही कादंबरी लिहिली. सदर कादंबरीत समकालीन मुला—मुलींची प्रसारमाध्यमाच्या काळातील—पर्यावरणातील मनोव्यवहाराचे चित्रण केले आहे. शिवाय... पुन्हा नव्या लॉग—इनचे आमंत्रण देणारी यावरून प्रसारमाध्यमांचा या प्रभावातूनच सदर कादंबरीचे शीर्षक ठरते. हे सुद्धा अधिक अर्थपूर्ण आहे. याशिवाय अलीकडच्या काळातील अनेक कवितांचे विषय, शीर्षक आणि ग्रंथ शीर्षकं कवितांचे प्रसारमाध्यमांचा प्रभाव विशद करणारा आहे.


मराठी ब्लॉगवरचे साहित्य

१९८९ नंतर खऱ्या अर्थाने इंटरनेटचा उदय झाला आणि त्यानंतर सर्वच क्षेत्रात नेटने क्रांतिकारी वेगवान पद्धतीने शिरकाव झाला. याला साहित्यविश्व हे क्षेत्र देखील अपवाद ठरले नाही. आज जगभरात, मराठीत सुद्धा देश—विदेशातून मराठी भाषेतून ब्लॉगच्या माध्यमातून नवसाहित्य लिहिले जात आहे. शिवाय यामध्ये गुणवत्तापूर्ण स्वरूपाचे दर्जेदार साहित्य प्रकाशित होताना आढळून येते. अलीकडे मराठी फॉन्ट सहज स्वरूपात टाईप करता येत असल्यामुळे लेखक वाचक संवाद ब्लॉगवरून होताना आढळून येतो. कविता महाजन, संदीप कुलकर्णी, सलील कुलकर्णी, संवना पेठे आदी महत्वाचे कवी लेखिका यांचे ब्लॉगवर साहित्य आढळून येते. याशिवाय नवीन पिढीतील अनेक लेखक इंटरनेटच्या माध्यमातून साहित्यविश्वातील बऱ्याच घटना संवाद करताना आढळतात. याशिवाय थोडे मागे जाऊन पाहता लोकसाहित्याचे अनेक महत्वाचे अभ्यासक आपले संशोधन लेखन, सर्वप्रथम वृत्तपत्रातून प्रसिद्ध करतात व त्यानंतर त्यातील निवडक लेखक त्याला ग्रंथ रूप देताना दिसून येतात. एकूणच आजच्या समकालीन काळात सुद्धा प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य यांचा विशेष सहसंबंध आहेत व मराठी साहित्य व भाषेच्या वृद्धीच्या दृष्टीने अत्यंत सकारात्मक अशी बाब आहे.

निष्कर्ष :

- आधुनिक काळात प्रसारमाध्यमे ही समकालीन समाजजीवनाचा एक महत्त्वाचा घटक बनला आहे.

- प्रसारमाध्यमाचा सद्याच्या काळातील प्रसार व प्रचारामुळे (विशेषत: इलेक्ट्रॉनिक मिडीयामुळे) समकालीन समाजविश्वाशी जोडला जात आहे. त्याचप्रमाणे विश्वातील अनेक गोष्टीशी इलेक्ट्रॉनिक मिडीयामुळे परिचित होत आहेत.
- सद्यकाळात प्रसारमाध्यमे हे दृकश्राव्य स्वरुपात चलतचित्रणाच्या जोरावर समाजमन घडविण्यात परिणामकारक ठरत आहे.
- व्यक्ती, समाज, संस्था, राष्ट्र, आंतरराष्ट्रीय संबंध व घटना यांवर प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष प्रसारमाध्यमे प्रभाव टाकतात.
- आजच्या काळात प्रसारमाध्यमे समकालीन समाजाचा स्थायीभाव बनला असल्याने प्रसारमाध्यमांचे स्थान व महत्त्व सर्वच क्षेत्रात अनन्यसाधारण बनले आहे.
- समकालीन समाजात प्रसारमाध्यमाचे महत्त्व लक्षात घेता प्रसारमाध्यमांनी विश्वसनीयता जपणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे आवश्यक आहे.



Category


# Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2349-7[illegible]43 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. [illegible] |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@[illegible] |
| Phone No | +91 [illegible] |
| Cosmos Impact Factor | 2015 : [illegible]452 |

GIF

GLOBAL IMPACT FACTOR





Get Involved

Research Journey

Recently Added Journals